<u>नि.दि.दा.क्र.३०५/२०१६</u>
नि.क्र. १४०
दि.१२.०८.२०२६

**<u>वादींतर्फे साक्षीदार क्र. २ चा जबाब</u>**

नावः– प्रमोद गणेश तुपे ,
वयः– ३८ वर्षे,
व्यवसायः– आवक जावक लिपीक, उप–अधिक्षक भूमी–अभिलेख कार्यालय, बार्शी
राहणारः– बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**<u>सरतपास वादींतर्फे विधीज्ञ श्री. बी. आर. फडके यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. सन २०१२ ते २०१९ पर्यंत मी भूमी अभिलेख कार्यालय, दौंड येथे भूकरमापक म्हणून कार्यरत होतो. मार्च २०१८ मध्ये उपअधिक्षक, भूमी अभिलेख दौंड यांच्याकडून न्यायालयाच्या आदेशानुसार पाटस येथील गट नं. ५७१ आणि ८२४ यांची एकत्रित मोजणी करण्याकरिता कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात आले. सदर मोजणीकामी फी भरुन त्याचे चलन वादीने कार्यालयात हजर केले होते. सदर मोजणी करणेकामी मी सर्व हिस्सेदारांना दि. १३.०४.२०१८ रोजी मोजणी करण्याबाबत वादी, प्रतिवादी आणि लगत कब्जेदादारांना रजिस्टर पोस्टाने नोटीसा काढल्या. त्या नोटीसच्या पोस्टाच्या पावत्या मी कमिशन कामासोबत हजर केल्या आहेत. आता मला दाखविण्यात आलेल्या पोस्टाच्या १९ पावत्या त्याच आहेत. त्यांना जनरल क्लॉजेस ॲक्टनुसार गृहतक असल्यामुळे **<u>नि. १४१</u>** एकत्रात देण्यात येत आहेत. नोटीसाप्रमाणे मी दि. २६.०४.२०१८ रोजी जागेवर जाऊन ईटीएसच्या आधारे मोजणी केली. मोजणी केल्यानंतर जागेवर उपस्थितांचा जबाब नोंदविला. आता मला दाखविण्यात आलेला जबाब तोच आहे. त्यावर प्रविण भागवत, नवनीत भागवत, एस. एस. म्हस्के, संजय भागवत, यशवंत मारुती भागवत यांच्या सह्या आहेत. त्यावर माझी सही आहे. सदरचा जबाब मी स्वतः माझ्या हस्ताक्षरात नोंदविलेला आहे.

(सदरच्या जबाबास प्रतिवादी संजय भागवत यांच्या वकीलांनी आक्षेप नोंदविला की, त्या जबाबावर त्यांची सही नाही. **आदेश** – सदरचा आक्षेप हा प्रतिवादीच्या पुराव्यानंतर न्यायनिर्णयाच्या वेळी ग्राह्य धरला जाईल.)

त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. १४२</u>** देण्यात येत आहे. मोजणीकाम पूर्ण झाल्यानंतर कार्यालयात येऊन नकाशा तयार केला. आता मला दाखविण्यात आलेला नकाशा तोच आहे. त्यावर माझी, छाननी लिपीक आणि शिरस्तेदार यांची सही आहे. सदर

नकाशात समजुतीच्या टिपांमध्ये निळ्या रंगाने दाखवलेले क्षेत्र हे गट नं. ५७१ चे असून गट नंबर ८२४ धारकाच्या वहिवाटीत आहे. तसेच लाल रंगाने चौकोनमध्ये दाखवलेले पक्के बांधकाम गट नंबर ५७१ मधील असून अतिक्रमण केलेल्या भागात आहे. हिरव्या रंगाने कॅनॉलचे हद्द दाखवलेले आहे. मी केलेल्या मोजणीप्रमाणे नकाशा तयार करुन कार्यालयात हजर केला. तो नकाशा माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून मी स्वतः काढलेला आहे. त्यास **नि. १४३** देण्यात येते. माझे मोजणीचे काम पूर्ण करुन कोर्ट कमिशन अहवाल उपअधिक्षक, भुमीअभिलेख दौंड यांनी न्यायालयात नि. ३२ अन्वये दाखल केले.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी क्र. ३, ७अ आणि ८ तर्फे विधीज्ञ श्री. ए. एस. महाजन यांच्यामार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, कोर्ट कमिशनकामी ज्याच्या वतीने आदेश झाला आहे त्याने कार्यालयात येऊन फी भरण्यासाठी अर्ज द्यावा लागतो. सदर प्रकरणात फी भरण्याचा अर्ज प्रविण माधवराव भागवत यांनी दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या अर्जात हिस्सेदार, सहहिस्सेदार यांची माहिती दिलेली असते. हे म्हणणे खरे आहे की, नि. १३७ नुसार मी कोर्ट कमिशनचे काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. १३७ मधील नमूद लगत कब्जेदारांना प्रकाश विठ्ठल भागवत, रोहिदास विठ्ठल भागवत, चेतन विनायक भागवत, संजय म्हस्के, रजनी नागेश ढमाले, नागेश रंगराव ढमाले, विश्वास प्रभाकर अवचर, बनकर सर, अशोक निळकंठराव शितोळे, पांडुरंग भागवत यांना नोटीसा काढल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, नि. १३७ चा अर्ज न्यायालयाच्या आदेशानुसार देण्यात आला होता आणि त्या आदेशानुसार मी मोजणी केली होती. मी आतापर्यंत २० ते २५ कोर्ट कमिशन मोजणी केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आधी वहिवाटीप्रमाणे मोजणी होते आणि त्यानंतर हद्द कायम केल्या जातात. कोर्ट कमिशनकामी सर्वप्रथम मोजणी दि. २६.०४.२०१८ रोजी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, ती मोजणी मी वहिवाटीप्रमाणे केली होती. ती मोजणी केल्यानंतर हद्द कायम केलेली नाही. साक्षीदार म्हणतो, कोर्टाच्या आदेशानुसार मोजणी करुन अहवाल सादर केलेला आहे. मोजणी करण्यापूर्वी त्या मिळकतीचा गट नकाशा, स्कीमचा उतारा, सर्वे नंबर नकाशा आणि टिपण असे कागदपत्र जमा करावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीच्या कामी मी वादातील दोन्ही गट नंबरचे ७/१२ हस्तगत करुन घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेली मोजणी ही सर्वे नंबर, टीपण आणि गट नकाशे बघून केली होती. दोन्ही गट नंबरमधून कॅनॉल गेलेले आहे. परंतु ते कॅनॉल ब्रिटीश काळचे असल्यामुळे कॅनॉलचे क्षेत्र वगळून गट बांधणी करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, कॅनॉलला किती क्षेत्र

गेलेले आहे हे आमच्या अभिलेखावरुन स्पष्ट दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोर्ट कमिशनकामी हजर केलेले गट नकाशावरुन गट नं. ८२४ च्या मधून कॅनॉल गेल्याचे दिसून येत आहे. सदरचा गट नकाशा उलटतपासात रेफर केल्यामुळे आणि पब्लीक डॉक्युमेंट असल्यामुळे त्यास **नि. १४४** देण्यात येते. वादीच्या गटाचे जुना सर्वे नं. ५२६ व ५७१ असा आहे आणि प्रतिवादीच्या गटाचा जुना सर्वे नं. ५२७, ५२८, ३३२ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नंबरच्या नकाशामध्ये देखील वादीच्या गट नं. ५७१ च्या पश्चिम बाजूने ओढा गेल्याचे दिसून येते आणि उत्तर बाजूला कॅनॉल असल्याचे दिसून येते. सदरचा सर्वे नंबरचा नकाशा उलटतपासात रेफर केल्यामुळे ओळखीसाठी त्यास **नि. १४५** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नंबरच्या नकाशातील ओढ्याची हद्द हीच गट नंबरच्या नकाशात हद्द राहील. हे म्हणणे खरे आहे की, ती हद्द जिल्हा अधिक्षकांच्या आदेशाशिवाय बदलली जाऊ शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जुन्या हद्दीच्या दगडाच्या आधारे आम्ही नवीन मोजणी करतो. वादातील कोर्ट कमिशन मोजणी करतेवेळी जुन्या हद्दीचा दगड कोठे होता हे मी आता सांगू शकत नाही. वादातील मोजणी मी कोणत्या बाजूने करण्यास सुरुवात केली हे आता आठवत नाही. वादीच्या गट नं. ५७१ मध्ये पश्चिमेला ओढयाची रुंदी आणि हद्द मी सांगू शकत नाही. मी वादातील मोजणी जागेवरील संपूर्ण वहिवाटीच्या आधारे केली होती. हे म्हणणे खरे आहे की, वहिवाटीच्या आधारे मोजणी करुन नकाशा तयार करुन अहवाल सादर केला. कोर्ट कमिशनकामी दाखल केलेल्या गाव नकाशावरुन गट नं. ५७१ मधील ओढा गोलाकार दिसून येतो. सदरचा नकाशा उलटतपासात रेफर केल्यामुळे त्यास **नि. १४६** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, नि. १४५ वरील सर्वे नंबरच्या नकाशात देखील ओढा हा गोलाकार दिसून येत आहे. सदरचा गोलाकार हा पश्चिम दिशेला बाहेरच्या बाजूने दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की, कॅनॉलवर जुने दगडाचे पूल आहे. हे म्हणणे खरे आहे की, कॅनॉलचे लगत कंट्रोल क्षेत्र असते जे मी नकाशावरुन सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ८२४ मध्ये कॅनॉलचे क्षेत्र किती आहे व ते कुठून सुरु होऊन कुठपर्यंत आहे हे मी सांगू शकत नाही. मी दाखविलेल्या मोजणी नकाशात कॅनॉलचे क्षेत्रात कॅनॉल कंट्रोल क्षेत्रसहीत दाखवलेले आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, वादातील मोजणी करतेवेळी कॅनॉलबाबत पाटबंधारे खात्याकडून कागदपत्र हस्तगत करुन घेतले नाहीत. साक्षीदार म्हणतो, कॅनॉलचे क्षेत्र गाव नकाशात नमूद असल्यामुळे पाटबंधारे खात्याकडून कागदपत्रे घेण्याची आवश्यकता वाटली नाही. प्रतिवादी यांच्या गटातून कॅनॉल कंट्रोलचे क्षेत्र स्केलच्या आधारे दाखवलेले आहेत. ते नेमके किती मीटर आहे ते स्केलवरुन सांगता येईल. हे म्हणणे खरे आहे की, वादीने माहितीच्या अधिकाराखाली पाटबंधारे विभागाकडून कॅनॉलचे क्षेत्र किती आहे याची माहिती काढून त्याबाबतचे पत्र आमच्या कार्यालयात दिले होते. मी माझी मोजणी आमच्या अभिलेखाप्रमाणे केलेली आहे. पाटबंधारे विभागाकडील

कागदपत्रांच्या आधारे केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील मोजणीच्या नोटीसा मी प्रतिवादींना दिलेल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, नि. १३७ च्या अर्जामध्ये प्रतिवादी संजय यशवंत भागवत यांचे नाव नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीमध्ये इंच चा फरक देखील पडला तर संपूर्ण हद्दी चुकतात. हे म्हणणे खरे नाही की, मी वादातील मोजणी आमच्या अभिलेखानुसार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी प्रतिवादी यांच्या सर्वे नंबरचा बांध किती फुटाचा आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष जागेवर जाऊन मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटा अहवाल सादर करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.४ ते ६ यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात येत असल्यामुळे आणि प्रतिवादी क्र. २अ यांचा विना कैफियत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द "उलटतपास नाही" असा आदेश पारित करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-
**(एस. ए. विराणी)**
दिनांकः- १२.०८.२०२६. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.